# पक्षी अभ्यास

## १. पक्षीः

पक्षी म्हणजे दोन पायांचे, पिसे, पाठीचा कणा असलेले उष्ण रक्ताचे प्राणी होत. अंगावरच्या पिसांमुळे त्यांचे अति थंडी व अति उष्णतेपासून संरक्षण होते. पक्षी अंडी घालतात आणि पिल्लांच्या रक्षणासाठी घरटी बांधतात. निसर्गात पक्षी हे कीटकांवर नियंत्रण, उपद्रवकारी प्राण्यांचा नाश करणारे व बिज प्रसारक म्हणून महत्वाची भूमिका बजावतात. गिधाडे सफाई विशेषज्ञ म्हणून ओळखले जातात तर कोंबडी सारखे बरेच पक्षी माणसांच्या अन्नाची गरज भागवतात आणि कुरव सारख्या सागरी पक्षांची विष्ठा बहुमूल्य खत म्हणून वापरली जाते. मैना, तांबट आणि धनेश हे पक्षी वडवर्गीय झाडांच्या बीजप्रसाराचे बहुमूल्य काम करतात. घुबड, ससाणे, कापशी उंदरांवर नियंत्रण ठेवतात तर भोरड्या शेतातील टोळांचा नाश करतात. बगळ्यासारखे पक्षी छोटे खेकडे खातात ज्यामुळे पावसाळ्यात भातपिकांचे नुकसान कमी होते.आंबा पिकाचे नुकसान करणाऱ्या मँगोस्टेम बोअरर यासारख्या खोडकिडींचे नियंत्रण स्वर्गीय नर्तक हा पक्षी करतो. शेकाट्या, वंचक, बगळे हे प्रामुख्याने कीटक भक्षी असून मुख्यतः प्रदूषित पाण्याच्या ठिकाणीच मोठ्या प्रमाणात दिसतात.

१.१. प्रश्न आणि शोध–

१) वरील भूमिका निभावणारे कोणकोणते पक्षी आपल्या परिसरात आढळतात याचा शोध घ्या ?

२) पक्षी विशिष्ट झाडावरच विशिष्ट प्रकारचं घरटं का बांधतात ?

ही मार्गदर्शिका आसपासच्या पाणथळी जागा, माळराने, जंगल व शेतीचा परिसर येथे दिसणाऱ्या काही सामान्य, काही विशेष तर काही स्थलांतरीत पक्ष्यांना ओळखण्यासाठी उपयोगी येईल या मर्यादित उद्देशाने बनविली आहे. पक्षी अभ्यास कृती कार्यक्रमात दिल्याप्रमाणे पक्षी ओळखून न थांबता त्यांच्या संख्या, उडणे, अन्न मिळविणे आवाज व आपपसातील संवादाच्या पध्दती, घरटी इत्यादी बाबींचा सुक्ष्मपणे अभ्यास करणे अपेक्षित आहे.

## २. पक्षांचे स्थलांतरः
## (भटकंती, दक्षिण गोलार्धातील तुलनेने गरम प्रदेशात स्थलांतर करतात.....)

पक्ष्यांचे निश्चित एका दिशेने, ऋतूमानानुसार मोठ्या प्रमाणावर आणि लांब अंतरावरील दोन्ही बाजूंनी नियमित येणं आणि परत जाणं म्हणजे स्थलांतर होय. साधारणतः ते ऑक्टोबरमध्ये थंडीची चाहूल देणाऱ्या शरद ऋतूमध्ये उत्तरेकडून दक्षिणेकडे जातात आणि वसंत ऋतूत दक्षिणेकडून उत्तरेकडे परत जातात. या प्रवासाला शरद आणि वसंत ऋतुतील स्थलांतर म्हणतात. पक्षांच्या स्थलांतराचे वेगवेगळे प्रकार आहेत. शरद ऋतूत जसजशी थंडीत वाढ व्हायला लागते, जोराचे वारे वाहू लागतात या वाऱ्यांपासून वाचण्यासाठी पक्षी उंच पर्वतीय प्रदेशातून खालच्या दिशेकडील पर्वतांच्या पायथ्यानजिक असणाऱ्या टेकड्यांकडे तसेच सपाट जमिनीकडे जातात व हिवाळा संपेपर्यंत तिथेच वास्तव्य करतात. वसंताच्या आगमनानंतर बर्फ वितळायला सुरुवात झाल्यावर पक्षी परत खालून वरच्या दिशेने उंच पर्वतीय प्रदेशाकडे त्यांच्या प्रजोत्पादनाच्या ठिकाणी परततात. तिथे शरद ऋतू सुरू होईपर्यंत राहतात.

अन्नाच्या शोधात पक्षाने कोणत्याही दिशेने काही किलोमीटरचा प्रवास केला तरी त्याला रूढ अर्थानं स्थलांतर म्हणत नाहीत तर त्याला अन्नाच्या शोधार्थ भटकणं असं म्हणता येईल. स्थलांतर हा पक्षांच्या दृष्टीने आव्हानांनी भरलेला खडतर प्रवास असतो. विविध प्रकारचे हजारो पक्षी स्थलांतराच्या दरम्यान विविध अडथळ्यांमुळे त्यांच्या इच्छित स्थळी पोहचत नाहीत; याला कारण म्हणजे वातावरणातील बदल, काही वेळा दाट धुक्यामुळे त्यांना दिशेचा अंदाज येत नाही, स्थलांतराच्या दरम्यान पुरेसे अन्न मिळाले नाही तसेच विमानतळावरील प्रखर सर्च लाईटच्या प्रकाशामुळे ते गोंधळून जातात, स्थलांतराच्या दरम्यान काही ठिकाणी त्यांची शिकारही होते पण आंतरिक प्रेरणेने व प्रजोत्पादनासाठी ते या खडतर आणि प्रतिकूल परिस्थितीतही स्थलांतर करतात.

थोडक्यात थंडीमुळे व बर्फवृष्टीमुळे उत्तर गोलार्धातील अन्नसाठे गोठले जातात त्यावेळी साधारणपणे नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यांमध्ये विविध पाणपक्षी व माळावरचे पक्ष, स्थलांतर करून हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध जलाशयांवर हजेरी लावतात व पुन्हा फेब्रुवारी ते मार्च महिन्यामध्ये आपल्या घराकडे परततात.

भारतामध्ये साधारणतः ३०० पक्षी स्थलांतर करून येतात त्यापैकी महाराष्ट्रात येणारे काही प्रमुख स्थलांतरील पक्षी खालीलप्रमाणे–

शॉव्हेलर, मलार्ड ही बदके ३००० ते ७६०० कि.मी.चा प्रवास करून सैबेरियातून भारतात येतात व विविध जलाशयांवर आपली हजेरी लावलाल. मलार्ड या बदकाचा उडण्याचा कमाल वेग ताशी ८० कि.मी. इतका आहे. शिकारी पक्षांमध्ये स्पॅरो हॉक ऑस्प्रे, मार्श हॅरियर, पेरिग्रीयर फाल्कन हे पक्षी स्थलांतर करतात.

करकोचा (क्रेन)– डोमेसियल क्रेन–कांड्या करकोचा

हंस (गीज)– ग्रे लेग गीज, बार हेडेड गीज – मातकट पायवाला हंस, पट्टेदार डोक्याचा हंस (पट्टकदंब)

करकोचा (स्टॉर्क) – पांढरा करकोचा ( व्हाईट स्टॉर्क), काळा करकोचा ( ब्लॅक स्टॉर्क)

धोबी (वॅगटेल)– यलो वॅगटेल (पहिला स्थलांतर करून येणारा हिवाळी पक्षी) याचे प्रजनन बलुचिस्थान व हिमालयात होते. सिट्रीन वॅगटेल.

वेडर्स (पाणथळी प्रदेशांच्या काठावरचे पक्षी): ब्लॅक टेल गॉडवीट, कर्ल्यू, स्नाईप, क्रॅब प्लोव्हर्स, अॅव्होसेट, ऑयस्टर कॅचर, लिटील स्टींट इ.

इतर– रोझी स्टार्लींग (भोरडी), कॉमन स्वॅलो

२.१. महाराष्ट्रातील पक्षी निरीक्षणाच्या महत्वाच्या जागा
नाथसागर जलाशय (पैठण- औरंगाबाद), मायणी पक्षी अभयारण्य ( खटाव- सातारा), जायकवाडी (औरंगाबाद), शिवडी (मुंबई), कळंबा तलाव, रंगाळा तलाव (कोल्हापूर), सिध्देश्वर तलाव (सोलापूर), नांदूर मदमेश्वर (नाशिक), वीर जलाशय, उजनी जलाशय, मुळशी जलाशय, पवना जलाशय, पाषाण लेक, भिगवण, इंदापूर (पुणे), गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा येथील विस्तीर्ण जलाशय इ.

२.२. पक्षी स्थलांतराचा खेळ

उद्दिष्टेः
१. मुलांना पक्ष्यांच्या स्थलांतरात येणारे अडथळे याबाबत आकलन होणे.
पातळीः इ. ७ वी ते १२
साहित्यः लेबल, पेपर, यू पिन,
विषयः विज्ञान आणि शारीरिक शिक्षण

या निसर्ग खेळामध्ये काही मुले स्थलांतरील पक्ष्यांची भूमिका करतील आणि काही मुले पक्ष्यांच्या मार्गातील येणाऱ्या अडथळ्यांची भूमिका बजावतील. जी मुले स्थलांतरील पक्ष्यांची भूमिका बजावतील त्यांनी त्यांच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांना सामोरे जायचे आहे आणि त्याचा अनुभव घ्यायचा आहे. एक मोठा जागा शोधा आणि त्याच्या उत्तर व दक्षिण टोकावर सीमा आखून घ्या. या सीमेच्या आत जमिनीवर सहा वर्तुळं आखून घ्यायची. ही वर्तुळे अडथळा दर्शवतील. खेळाच्या एका फेरीत १२ मुले सहभागी होऊ शकतात, वर्गातील इतर मुले सीमेच्या बाहेर उभी राहून पाहतील.
प्रत्येक फेरीत सहा मुले प्रत्येकी एका एका वर्तुळावर उभे राहतील. ही मुले अडथळ्याचे काम करतील. अडथळा कोणता हे दर्शविण्यासाठी चिठ्ठी अंगावर लावावी लागेल. उदा. प्रदूषण, युध्द/लढाई, हवामानातील बदल, शिकार, बांधकामाच्या कृती इ. इतर सहा मुले स्थलांतरील पक्षी म्हणून उभे राहतील. या सगळ्या मुलांनी कोणत्याही अडथळ्यात न अडकता उत्तरेकडून दक्षिणेकडे स्थलांतर करायचे आहे. मुलांना इशारा देताच त्यांनी त्यांचे पक्ष्यांप्रमाणे हात हालवत जायचे आहे. अडथळा निर्माण करणाऱ्या मुलांनी वर्तुळाच्या एकाच दिशेने फिरायचे आहे आणि हे करताना वर्तुळाच्या बाहेर न जाता पक्षी बनलेल्या मुलांना पकडण्याचा प्रयत्न करायचा आहे. हे करताना तेत्यांच्या हातांना ताण देवू शकतात. जर तो पक्षी बनलेला मुलगा अडथळ्यात अडकला गेला तर तो तिथेच गोठला जाईल किंवा मृत समजला जाईल.
स्थलांतर करताना पक्ष्यांनी (मुलांनी) सातत्याने हात हलविले पाहिजेत आणि त्यांनी एका जागेवर उभे राहायचे नाही. उत्तरेकडून दक्षिणेकडे स्थलांतर करताना काही पक्षी (मुले) सुरक्षित जातील तर काही अडकून पडतील.
प्रत्येक फेरीनंतर किती पक्षी सुरक्षितपणे दक्षिण भागात पोहचले हे पहायचे आणि उरलेल्या पक्ष्यांचे काय झाले यावर चर्चा करायची.

२.३. प्रश्न आणि शोध
१) तुमच्या परिसरामध्ये स्थलांतरीत पक्षांना कोणते धोके आहेत असे तुम्हाला वाटते ? आणि त्यासाठी तुम्ही काय कराल ?
२) आपल्या भागात आढळणाऱ्या पक्ष्यांना स्थानिक बोली भाषेमध्ये कोणकोणती नावे आहेत ? त्याची नोंद करा.

## ३. पाणथळ जागा

पाणथळ जागा म्हणजे जमीन आणि पाणी या दोहोंच्या मिलापाचे प्रदेश. यातील काही नैसर्गिक तर काही माणसांनी कृत्रिमरित्या निर्माण केलेले असतात. यामध्ये डबकी, दलदली, नद्या, ओढे, नाले, तलाव, जलाशय, समुद्र, खाड्या, मिठागरे ही पाणथळ जागेची वेगवेगळी रुपे आहेत. हिवाळ्यामध्ये विविध प्रकारचे स्थलांतरीत पक्षी या ठिकाणी हजेरी लावतात. यामध्ये पाणडुबी, पाणकावळा, कोंबडी, शेकाट्या, नदीसुरय, धोबी, रोहीत, चक्रवाक असे विविध पक्षी तेथील स्थानिक पक्षांसमवेत हजेरी लावतात. त्यांचे निरीक्षण करणे व नोंदणी घेणे हा आपल्या इको- क्लबच्या कृती कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असेल.

३.१ प्रश्न आणि शोध
१) आपल्या परिसरातील नदी, ओढा, नाला यांची लांबी कशी मोजाल ?
२) तळ्याचे क्षेत्रफळ कसे मोजाल ?
३) स्थलांतरील पक्षाची गणना कोणत्या पध्दतीने करता येईल ?
४) बगळा, खंड्या, नदीसुरय यासारखे पाणथळ जागेजवळ आढळणाऱ्या पक्षांना एक शिकार मिळविण्याठी किती प्रयास करावे लागतात याचे निरीक्षण व नोंद करा ?
५) साळुंखी चालताना, भक्ष्याच्या शोधार्थ डोक्याला पुढे-मागे झटका देत चालते. १० मिनिटांमध्ये ती साधारण किती वेळा हालचाल करते याचे निरीक्षण व नोंद करा ?
६) पिवळा धोबी (यलो वॅगटेल) हा पहिला स्थलांतर करून पक्षी आपल्याकडे येतो व विविध जलाशयांवर हजेरी लावतो. तो पहिल्यांदा केव्हा दिसला व शेवटी केव्हा गेला याची नोंद करा.
७) आपल्या परिसरात आढळणाऱ्या पाणथळ पक्षांची निरीक्षणे खालील तक्त्याच्या आधारे करा ?

## पक्षी निरीक्षण करताना लक्षात ठेवावयाच्या बाबी

पक्षी निरीक्षण डायरी

१) दिनांक :..........................................................................................................

२) वेळ :..........................................................................................................

३) ठिकाण :..........................................................................................................

४) हवामान :..........................................................................................................

५) चोचीचा रंग/आकार : ..........................................................................................................

६) डोळ्याचा रंग : ..........................................................................................................

७) मानेचा रंग/गळ्याचा रंग/पाठिचा रंग : ..........................................................................................

८) पंखाचा रंग आतून- बाहेरून/पोटाचा रंग/शेपटीचा रंग/ आकार : .................................................................

९) पक्षाचे आकारमान : ..........................................................................................................

१०) पक्षी काय करत होता ? : ..........................................................................................................

११) पक्षाचे चटकन नजरेत भरणारे वैशिष्ट्य : ..........................................................................................

१२) उड्डाण : ..........................................................................................................

१३) पक्षाचे नाव- ठाऊक असल्यास/ओळखता आल्यास : ..........................................................................

१४) नर/मादी फरक- दिसतो कसा ?: ..........................................................................................

पाणपक्षांची गणना हेड काऊंट (त्यांची डोकी मोजून) सकाळच्या वेळी केली जाते. यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक, क्षेत्र मार्गदर्शक पुस्तिका, दुर्बिण असणे अत्यावश्यक ठरते.

## ४. माळरान आणि काटेरी झाडाझुडपांचा प्रदेश

या प्रदेशात प्रामुख्याने बोर, बाभूळ, खैर, तरवड, भूईरिंगणी, काटेचेंडू, नेपती व गवताचे विविध प्रकार पहावयास मिळतात. या ठिकाणी विविध स्थानिक भटकंती करणारे व स्थलांतरील पक्षी हिवाळ्यात हजेरी लावतात. भोरड्या, रानचिमणी, खाटीक, मुनिया, भारीट, निलपंख, कोतवाल तसेच विविध शिकारी पक्षी या ठिकाणी हिवाळ्यात आढळतात. त्यांच्या नोंदी व दैनंदिन दिनचर्या अभ्यास आपणाला करावयाचा आहे.

५. शेतीचा परिसरः

महाराष्ट्र ातील शेतीचे कोरडवाहू (जिरायती ) व बागायती असे प्रकार पडतात. खरीप हंगामामध्ये जून ते नोव्हेंबर भात, नाचणी, ही पिके घेतली जातात तर रब्बी हंगाम हिवाळ्यामध्ये गहू, हरभरा, बाजरी, तूर, ज्वारी ही पिके घेतली जातात. काही ठिकाणी फळझाडांना प्राधान्य दिले गेले आहे जसे की कोकणात आंबा, काजू इ. पश्चिम महाराष्ट्रात ऊस हे पिक बारमाही घेतले जाते. कापूस आणि तृणधान्य (मटकी, तूर, मूग, उडिद इ.) मोठ्या प्रमाणात मराठवाडा, विदर्भमध्ये घेतली जातात. या शेतीक्षेत्रांमध्ये विविध स्थानिक- स्थानिक स्थलांतरीत पक्षीही आपणास पहायला मिळतात. रानचिमण्यांसारखे काही पक्षी शेतीचे नुकसान करतात तर काही शेतीला अपायकारी असणाऱ्या उपद्रवी किटकांचा नायनाट करतात जसे भोरड्या, कोतवाल सारखे पक्षी नाकतोडे, टोळ यांचा फडशा पाडतात.

६. वनक्षेत्रः

महाराष्ट्रामध्ये वनांची विविधता पहायला मिळते. यामध्ये प्रामुख्याने पाच विविध वनांचे प्रकार पहावयास मिळतात. दक्षिण उष्णकटिबंधीय निमसदाहरीत वने(चांदोली राष्ट्रीय उद्यान, कोयना अभयारण्य, राधानगरी अभयारण्य, दाजीपूर अभयारण्य, आंबा, आंबोली, भिमाशंकर अभयारण्य, इ.), दक्षिण उष्णकटिबंधीय आर्द्र पानझडी वने(प्रामुख्याने गडचिरोली व ठाणे जिल्हा) , दक्षिण उष्णकटिबंधीय शुष्क पानझडी वने (चंद्रपूर, नागपूर, अमरावती ), दक्षिण उष्णकटिबंधीय काटेरी वने (मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि पूर्व महाराष्ट्राचा काही भाग )व खारफूटी जंगले(ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग). खारफुटी जंगलांमध्ये तुतारी (सँडपायपर), रोहीत (फ्लेमिंगो), शेकाट्या सारखे काठावरती खाद्य शोधणारे काही पाणथळी पक्षी स्थलांतर करून येतात तर इतर वनक्षेत्रात नवरंग, स्वर्गीय नर्तक यासारखे पक्षी प्रामुख्याने एका वनक्षेत्राकडून दुसऱ्या वनक्षेत्राकडे स्थानिक भटकंती करतात.

रिचर्ड फाईनमन (११ मे १९१८ ते १५ फेब्रुवारी १९८८) अमेरिकेत विज्ञान लोकप्रिय करणारा आणि तितकाच प्रसिध्द वैज्ञानिक. भौतिकशास्त्रासोबत जीवशास्त्रातही बराच रस घेणाऱ्या या वैज्ञानिकास रुढी, चाकोरीबध्दता, तथाकथित मोठी माणसे, पदव्या, बक्षीस याबद्दल अजिबात आपुलकी नव्हती. भौतिक विज्ञानातील त्यांच्या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक देण्यात आले.

'मेलविल' बाबांचा लहानपणीचा प्रभाव, त्यांनी निरीक्षणाची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतंत्र विचाराची शिकवण याबद्दल 'द प्लेजर ऑफ फायडिंग थॉटस् आऊट' अर्थात 'शोधण्यातली गंमत' या पुस्तकात अनुभव सांगितले आहेत. पक्षी निरीक्षणासंबंधीचा अनुभव खूप बोलका आणि समर्पक असा आहे.

आम्ही न्यूयॉर्क शहरात रहायचे तेव्हा कॅटस्कील पर्वतावर नियमित जायचो. या ठिकाणी उन्हाळ्यात लोक नेहमी फिरायला येत असत. माझ्या बाबांसारख्या मोठ्या लोकांचा एक गट होता. या सर्वांना ऑफिस कामासाठी न्यूयॉर्क शहरात जावे लागायचे, पण शनिवारी, रविवारी सुट्टीत ते परत येत असत. माझे बाबा घरी यायचे तेव्हा मला ते खास जंगलात फिरायला घेऊन जायचेआणि जंगलातील नवनवीन अद्भूत गोष्टी ते मला सांगायचे. मलाही त्या सर्व गोष्टी खूप छान सांगता येत असत. माझ्या मित्रांच्या आईंना हे सर्व पाहून वाटायचे की, आपल्या मुलांनाही त्यांच्या वडिलांनी फिरायला न्यावे. त्यासाठी ते त्यांची मनधरणी करत पण यातून काही विशेष साध्य होत नव्हते. माझ्या मित्रांच्या आईंना असेही वाटायचे की माझ्या बाबांनी त्यांच्या मुलांना सोबत फिरायला घेऊन जावे पण माझे बाबा याला राजी नसायचे. कारण त्यांच्यासाठी माझ्यासोबत असणारे नाते खूप खास असे होते; म्हणूनच कदाचित ते शेवटपर्यंत टिकले असावे. असो एकूण माझ्या वडिलांच्या मित्रांना शेवटी त्यांच्या मुलांना रविवारी फिरायला घेऊनच जावे लागले. लगेच सोमवारी सर्व मोठी माणसे कामाला निघून गेल्यावर आम्ही सगळी मुले खेळायला जमलो होतो. एका मुलाने मला एका पक्षा विषयी विचारले हा पक्षी कोणत्या प्रकारचा आहे? मी म्हणालो, हा कोणत्या प्रकारचा पक्षी आहे याबद्दल मला अजिबात कल्पना नाही. त्या मुलानं हा तपकिरी गळ्याचा थ्रश की काहीतरी आहे अस म्हटलं आणि वर 'तुझे बाबा तुला काहीच सांगत नाहीत असं दिसतंय!'

खरंतर नेमकं उलटं होतं. माझ्या बाबांनी मला माहिती दिली नव्हती तर 'शिकवलं' होतं पक्ष्यांबद्दल. एखाद्या पक्ष्याकडं बघून बाबा म्हणायचे, ''तुला ठाऊक आहे का की तो कोणता पक्षी आहे? त्याला 'तपकिरी गळ्याचा थ्रश म्हणतात पण पोर्तुगीजमध्ये त्याला .... अमूक अमूक , चीनी, जपानी भाषांमध्ये तमूक तमूक....म्हणतात.... पण आता हे बघ, आपण त्या पक्ष्याला या भाषेत, त्या भाषेत काय म्हणतात याच्या मागं लागलेले असतो आणि शेवटी जेव्हा सगळं होतं तेव्हा खरंतर त्या पक्ष्याबद्दल आपण काहीच जाणलेलं, समजलेलं नसतं.... आपण प्रत्यक्षात वेगवेगळ्या ठिकाणच्या लोकांबद्दल जाणलेलं असतं! आता चल आपण त्या पक्ष्याकडं पाहू....'' मात्र माझ्या बाबांनी गोष्टी- घटनांकडे पाहण्यास- निरीक्षणास शिकवलं होत.

रिचर्ड फाईनमनः'द. प्लेजर ऑफ फायडिंग थॉटस् आऊट' या पुस्तकातून.

## ८. पक्षी निरीक्षणाला जाताना...

१) पक्षी निरीक्षणासाठी सकाळची वेळ योग्य असते, कारण यावेळी पक्षांच्या हालचाली खूप असतात; त्यांच्या वर्तणुकीचा अभ्यासही आपणाला याद्वारे करता येतो.

२) पक्षी निरीक्षणाला जाताना शक्य तो ५ ते ८ मुलांचा गट असावा.

३) पक्षी निरीक्षणाला जाताना भडक रंगाचे कपडे न घालता निसर्गाशी मिळत्याजुळत्या रंगाचे कपडे व टोपी असावी.

४) सोबत पक्षी निरीक्षण छोटी नोंदवही, पेन- पेन्सिल तसेच संदर्भ पुस्तक, दुर्बिण असावी.

५) पक्षी निरीक्षण करताना वेगवान हालचाली टाळाव्यात जसे- मोठ्याने बोलणे, जलद चालणे, पायांचा आवाज करणे, पक्षी दिसल्यावर हातवारे करणे, आवाज करणे इ.

६) पाणथळ जागा उदा. तलाव, नदी किनारे या ठिकाणी पक्षी निरीक्षणासाठी गेल्यावर शक्यतो किनाऱ्यावरूनच निरीक्षण करावे. दलदलीत जाऊ नये.

७) एखादा पक्ष्याचे घरटे दिल्यास त्यातील पिल्लांना किंवा अंड्यांना हात लावण्याचा प्रयत्न करू नये तसेच घरटे काढण्याचाही प्रयत्न करू नये.

८) पक्षी निरीक्षण करताना दुर्बिण असल्यास खूप मदत होते. यासाठी ८ ४० अथवा ८ ३० या वर्धन क्षमतेच्या दुर्बिणी चांगल्या असतात. यामुळे पक्षी निरीक्षणातील बारकावे आपणाला समजतात व आनंद द्विगुणीत होतो.

९) पक्षी दिसल्यावर त्याचे निरीक्षण काटेकोरपणे करावे व त्याबाबतची निरीक्षणे ताबडतोब लिहावीत.

१०) पक्षी निरीक्षण करताना शांतता असणे खूप महत्वाचे आहे. मोठ्याने बोलणे, आरडा-ओरडा, गोंगाट केल्यास पक्षी घाबरून उडून जातात.

### ८.१. पक्षी निरीक्षण आणि संवर्धन करणाऱ्या काही राष्ट्रीय संस्था-

#### ८.१.१. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस)

पत्ताः हॉर्नबिल हाऊस, डॉ. सालीम अली चौक, शहीद भगतसिंग रोड, मुंबई ४०००२३.

प्रकाशनेः जर्नल ऑफ द बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, हॉर्नबिल (त्रैमासिक).

या संस्थेची स्थापना १८८३ मध्ये झाली. निसर्ग आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, शिक्षण आणि संशोधनाचे कार्य करणारी भारतीय उपखंडातील ही सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था आहे.

#### ८.१.२. सालीम अली सेंटर फॉर ऑर्निथॉलॉजी ॲण्ड नॅचरल हिस्ट्री (सॅकॉन)

पत्ताः कालंपालायम, कोइंबतूर, तामिळनाडू, ६४१०१०.

प्रकाशनेः सॅकॉन वार्तापत्र

सॅकॉनची स्थापना १९९० मध्ये झाली असून तिची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेतः

१. भारतातील जैविक विविधतेच्या संवर्धन व शाश्वत वापराच्या प्रयोजनासाठी आवश्यक अभ्यास करणे.

२. भारतातील पक्षी आणि निगडित परिस्थितिकीचा पक्षी संवर्धनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

८.१.३. वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (डब्ल्यू. आय. आय.)
पत्ताः पोस्ट बॅग नंबर १८, चंद्रबनी, डेहराडून २४८००१.
डब्ल्यू.आय. आय. सन१९१२ मध्ये स्थापना झाली असून तिची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.
१. संरक्षित वनक्षेत्रांचे व्यवस्थापन व वन्यजीव संशोधनासाठी जीवशास्त्रज्ञांना आणि संरक्षित वनक्षेत्र व्यवस्थापकांना प्रशिक्षण देणे.
२. प्रत्यक्ष व्यवहारात आणता येतील असे वन्यजीव संशोधन हाती घेणे, त्याची अंमलबजावणी करणे आणि भारतीय परिस्थितीत लागू पडणाऱ्या तंत्राचा विकास करणे.
३. सरकार तसेच स्वयंसेवी संस्थांना वन्यजीव संशोधनविषयक सल्ला व सेवा पुरवणे.

८.१.४. झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (झेड. एस. आय.)
पत्ताः २७, जवाहरलाल नेहरू रोड, कोलकाता, ७०००१६.
प्रकाशनेः झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे वार्तापत्र, नोंदी तसेच वार्षिक अहवाल.
देशभर प्राणीविषयक सर्वेक्षण करण्यासाठी सन १९१६ पासून झेड. एस.आय. कार्यरत आहे. कोलकाता येथील नॅशनल झूलॉजी कलेक्शन ऑफ इंडिया येथे सर्व प्राणीगटातील १० लाखांहून अधिक प्राण्यांचा मृतावस्थेतील संग्रह आहे. जोधपूर येथील डेझर्ट रिजनल स्टेशन आणि सोलन येथील अतिउंचीवरच्या संशोधन केंद्रासहीत १४ वेगवेगळ्या परिस्थतीय क्षेत्रात संकलन स्थानके उभारण्यात आली आहेत.

८.१.५. इंडियन बर्ड कन्झर्वेशन नेटवर्क (आयबीसीएन)
भारतातील पक्षी आणि एकंदर जैविक विविधतेच्या संवर्धनासाठी भारतातील अनेक संस्था आणि व्यक्तींनी मिळून आयबीसीएनची स्थापना केली आहे. भारतातील पक्षी आणि पक्ष्यांच्या अधिवासाचे संवर्धन करण्यासाठी संस्था, व्यक्ती आणि सरकार यांचे नेटवर्क उभे करणे हे आयबीसीएनचे ध्येय आहे. या नेटवर्कचे कार्य सहभागी संस्था व बीएनएचएसच्या कर्मचाऱ्यांमधून नेमण्यात आलेल्या संघटकामार्फत चालवले जाते.

८.१.६. मायग्रंट वॉच
पत्ताः नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस्, जी.के.व्ही. के. कॅम्पस, बेल्लारी रोड, बेंगलोर, ४५००६५, ई-मेलः mw.migrantwatch.in, संकेतस्थळः htpp://www.migrantwatch.in या संकेतस्थळावर आपण आपल्या नोंदी, छायाचित्रे पाठवू शकता.
प्रत्येक हिवाळ्यात हजारो स्थलांतरीत पक्षी भारतात येतात तेव्हा ते भारतभर कोणकोणत्या पाणथळी जागी भेट देतात, जागतिक तापमानवाढीमुळे त्यांच्या स्थलांतरावर मर्यादा आल्या आहेत का? प्रामुख्याने जुलै ते मे दरम्यान स्थलांतरील पक्षांची पहिली नोंद घेतली जाऊन ती मायग्रंट वॉच या संस्थेला पाठविली जाते. सिटीझन सायन्स प्रोग्रॅम आफ नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस्च्या मार्गदर्शनाखाली मायग्रंट वॉच हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या अभियानांतर्गत भारतातील २१६ स्थलांतरील पक्षांबद्दलची निरीक्षणे नोंदविण्यात आली आहेत . मायग्रंट वॉचशी संलग्न पक्षी निरीक्षक, पक्षी प्रेमी आपल्या निरीक्षण नोंदी व छायाचित्रे त्यांच्या संकेतस्थळावर पाठवतात. सन २०११ यावर्षी मायग्रंट वॉचच्या पक्षी गणना व नोंदणी या मोहिमेंतर्गत चातक पक्षाच्या भारतातील विविध ठिकाणी निरीक्षणे व नोंदी नोंदविल्या गेल्या आहेत. थोडक्यात २०११ हे वर्ष चातक पक्षाच्या विशेष अभ्यासासाठीचे वर्ष मायग्रंट वॉचने हाती घेतले आहे. सन २००८ साली सुरुवात झालेल्या या मोहिमेंतर्गत १३३४ नोंदणीकृत पक्षी निरीक्षक सदस्य आहेत. यापैकी ५५० सक्रीय पक्षी निरीक्षकांनी, अभ्यासकांनी पक्ष्यांबद्दलची निरीक्षणे नोंदविली आहेत.

८.२. महाराष्ट्र-
८.२.१. महाराष्ट्र पक्षी मित्र संघटना
महाराष्ट्रातील हौशी पक्षीमित्रांनी एकत्र येवून १९८१ साली ही संघटना स्थापन केली. या संघटनेच्यावतीने दरवर्षी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत पक्षीमित्र संमेलन आयोजित केले जाते तसेच सभासदांसाठी पक्षीमित्र हे त्रैमासिक प्रकाशित केले जाते. संस्थेची आजीव सभासद वर्गणी ५०० रुपये आहे. महाराष्ट्रातील विविध पक्ष्यांच्या नोंदी, निरीक्षणे, छायाचित्रे, लेख आपण या संस्थेला पाठवू शकता. या संस्थेचे मुख्यालय ११, युनायटेड पार्क,मार्कंडी, मु.पो. ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र ४१५६०५, फोन नं. ०२३५५-२५३०३०,
ई-मेलः pakshimitra@gmail.com, वेबसाईटः www.pakhimitra.org
८.३. महाराष्ट्रातील काही पक्षी मित्रांचे नाव व संपर्क क्रमांक-
१. विश्वास काटदरे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, मोबा. नं. ९४२३८३१७००
२. गोविंद रघुनाथ सबणीस, पंढरपूर, जि. सोलापूर, मोबा. नं. ९४२३३३५१३६
३. डॉ. अरविंद कुंभार, अकलूज, जि. सोलापूर, मोबा. नं. ९८२२१२४१११
४. रविंद्र अष्टेकर, कोल्हापूर, मोबा. नं. ९८२२८१०१३१
५. फारूक म्हेतर, कोल्हापूर, मोबा. नं. ९८२३१४७१६२
६. बंडा पेडणेकर, कोल्हापूर, मोबा. नं. ९९२२०१६९९९
७. शरद आपटे, सांगली, मोबा. नं.९८१०३८४४००
८. कौस्तुभ पांढरीपाढे, करंजा, जि. वाशीम, मोबा. नं.९८८१४२२६५०
९. अनिल माळी, नाशिक, मोबा. नं.९८५०८१८६२२
१०. विनोद पाटील, नाशिक, मोबा. नं.९४२१४००७०४

११. सुनील काटे, अंमळनेर, जि.जळगाव, मोबा. नं. ९४२०१११२१०
१२. प्रेमसागर मेस्त्री, महाड, जि.रायगड, मोबा. नं.९४२२६८९३७१
१३. रोहन भाटे, कराड, जि. सातारा, मोबा. नं. ९४२२००४८००
१४. नागेश दफ्तरदार, देवगड, सि.सिंधुदुर्ग, मोबा. नं.९४२११४६१४३
१५. डॉ. गिरीष जठार, पुणे, मोबा. नं. ९४०४२६४०८४
१६. डॉ. प्रमोद पाटील, पुणे, मोबा. नं. ९९६०६८००००

९. पक्षी निरीक्षणासाठी उपयुक्त पुस्तके
१. दक्षिण भारतातील पक्षी (मराठी) - रिचर्ड ग्रिमेट , टिम इन्स्कीप, प्रशांत महाजन, बीएनएचएस प्रकाशन, मुंबई. (रु.५००/- )
२. बर्डस् ऑफ वेस्टर्न घाट - कोंकण ॲण्ड मलबार - सतीश पांडे व निरंजन संत, ऑक्सफर्ड प्रकाशन, बीएनएचएस. (रु.९९५/- )
३. द बुक ऑफ इंडियन बर्डस् - डॉ सालीम अली, बीएनएचएस प्रकाशन (रु.४१५/- )
४. दोस्ती करुया पक्षांशी (मराठी) - किरण पुरंदरे, पर्यावरण शिक्षण केंद्र, मध्य भारत (रु. १२०/-)
५.अ फिल्ड गाईड टू द बर्डस् ऑफ इंडिया - क्रेस कॅसमझींक, ओम बुक सर्व्हीसेस् (रु. ८९५/-)
६. पॉकेट गाईड टू द बर्डस् ऑफ इंडियन सबकॉन्टीनंट - रिचर्ड ग्रिमेट, कॅरोल इन्स्कीप, टिम इन्स्कीप (रु. ७८०/-)

दि. २ फेब्रुवारी जागतिक पाणथळ दिवस
दि. १४ नोव्हेंबर (डॉ. सालिम अली पक्षी गणना आणि पक्षी विषयक अन्य कोणत्याही नोंदी आपण खालील ठिकाणी पाठवून जागतिक पक्षी गणनेत सहभागी होऊ शकता.)
१) बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, हॉर्नबिल हाऊस, डॉ. सालीम अली चौक, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई- ४०००२३

✻ मित्रांनो हे छोटेखानी पुस्तक परिपूर्ण नाही. या हस्तपुस्तिकेत सर्वसाधारणपणे आपल्या परिसरात सहज दिसणारे व काही हिवाळी पाहुणे म्हणून येणारे अशा निवडक पक्षांची माहिती दिली आहे. ही हस्तपुस्तिका मुलांना पक्षी निरीक्षणाचा छंद लागेल व आपल्या परिसरात येणाऱ्या खास करून स्थलांतरीत पक्षांचा अभ्यास व नोंदी ठेवायला हे एक निमंत्रण आहे. शेतामध्ये पाणथळ जागेवर, माळरानावर, जंगलामध्ये येणा-या या स्थलांतरील पंखवाल्या मित्रांना शोधून काढून त्यांच्या पारिवारीक जीवनाचा अभ्यास तुम्हाला करावयाचा आहे. सोबत क्षेत्र मार्गदर्शक (फिल्ड गाईड) पुस्तकांची यादी दिली आहे)

१०. काही दुर्मिळ व अति संकटग्रस्त प्रजाती

## १०.१. माळढोक
## Indian Bustard

आढळस्थानः सोलापूर, चंद्रपूर (वरोरा तालुका), अहमदनगर, नाशिक (ओझर)

वैशिष्ट्येः सुमारे १ मीटर उंचीचा माळढोक हा गवती माळरान प्रदेशातील एक रुबाबदार पक्षी आहे. पक्षी वजनदार असून, माळढोक नराचे वजन १० किलो तर मातीचे वजन ५ किलो असते. बाजूने काळे असलेले बदामी पंख, मुकुटासारखा काळा तुरा आणि लांब पांढरी मान असते. माळढोकला चांगले उडता येते पण उडण्यासाठी त्याला १५-२० फूट पळत जावे लागते. मादी एका वेळी एकच अंडे देत असल्याने या पक्ष्याची संख्या झपाट्याने वाढत नाही. तसेच याची अंडी बऱ्याच वेळा गुरांच्या पायाखाली तुडवली जातात. मुंगूस, साप यांच्याकडून ही अंडी खाल्ली जातात. हा पक्षी दोन्ही प्रकारचा आहार घेतो. करवंदे, बोर, तूर तर मांसाहारामध्ये कीटक, आळ्या, टोळ, पाली, उंदीर, साप हे त्याचे प्रमुख अन्न आहे. मांसासाठी केलेली शिकार आणि माळढोक राहणाऱ्या ठिकाणांचा नाश म्हणजे अधिवास आकुंचन यामुळे माळढोक या पक्षाला अतिसंकटग्रस्त प्रजात म्हणून जाहीर केले आहे. शेतीक्षेत्राच्या विस्तारामुळे त्याचा मूळचा अधिवास हा झपाट्याने नष्ट होत आहे. ३०-४० वर्षापूर्वी या पक्षाच्या खात्रीशीर नोंद कोल्हापूर, सातारा, सांगली तसेच विदर्भातील काही जिल्ह्यांत होती. आता मात्र तो सोलापूर, चंद्रपूर, अहमदनगर, नाशिक या जिल्ह्यांतील ठरविक ठिकाणीच आढळतो. संपूर्ण भारतामध्ये या पक्ष्याची संख्या जेमतेम ५००च्या आसपास असून, महाराष्ट्रामध्ये ३५ ते ४० एवढ्या संख्येनेच उरले आहेत.

## १०.२. तणमोर

## Lesser Florican

आढळस्थानः वाशीम, अकोला

वैशिष्ट्येः तणमोर हा सारंग कुळातील पक्षी असून, शुष्क गवताळ प्रदेशाचा रहिवासी आहे. नराला डोक्यावर तुरा असतो, झळाळीदार काळी मान, पांढरे पंख आणि पिवळसर पाय तर मादी मातकट बदामी रंगाची असते. विणीच्या हंगामात नर एका कालावधीमध्ये सहाशे वेळा उंच उड्या मारून मादीला आकर्षित करून घेण्याचा प्रयत्न करतो. या पक्ष्याचा अधिवास प्रामुख्याने गवताळ प्रदेशात असतो. गेल्या काही दशकांमध्ये गवताळ प्रदेशावर शेतीसाठी व इतर मानवी वापरासाठी/उपयोगासाठी झालेल्या अतिक्रमणामुळे या पक्ष्याच्या अधिवासाचा ऱ्हास झाला, ज्यामुळे या पक्ष्याची

संख्या झपाट्याने घटली आहे. परिणामी हा देखणा पक्षी संकटग्रस्त आहे. गेल्या दोन दशकामध्ये या पक्षाच्या खात्रीशीर नोंदी दक्षिण- पश्चिम घाटातील कोरड्या शुष्क गवताळ प्रदेशातील भागामध्ये केल्या होत्या; पण आता तो तेथे आढळत नाही. सद्यस्थितीत महाराष्ट्रातील नान्नज (सोलापूर), ओझर (नाशिक) व गंगापूर धरणाजवळ तसेच वाशीम,अकोला या ठिकाणी आढळतो.

## १०.३. कवडा धनेश

### Great Hornbill

आढळस्थानः पं. घाटातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, कोल्हापूर तसेच विदर्भ.

वैशिष्ट्येः मोठ्या आकाराचा, चोच पिवळी, त्यावरील शिंग पिवळे, डोळे लाल, मान पांढरट पिवळी, शेपटी पांढरी संयुक्त त्यावर काळा पट्टा. फायकस कुळातील (वड, उंबर, पायर इ.) वनस्पतींचा बीज प्रसार करण्यामध्ये मोठा वाटा. या जातीतील पक्षांची घरटी वैशिष्ट्यपूर्ण असतात. विणीच्या हंगामात मादी प्रामुख्याने जुन्या झाडाच्या ढोलीत जाऊन बसते. स्वतःची विष्ठा, माती, शेण इत्यादींने ढोलीचे तोंड लिंपून घेते. फक्त चोच बाहेर काढता येईल एवढेच छिद्र ठेवते. या दरम्यान मादीला व कालांतराने पिल्लांना भरविण्याची जबाबदारी नर सांभाळतो. पिल्लांना पिसे येईपर्यंत मादी घरट्यातच राहते. नंतर ती लिंपण फोडून बाहेर येते व पुन्हा घरट्याचे तोंड लिंपून घेते. तद् नंतर नर व मादी मिळून पिल्लांना भरवतात. या पक्ष्यांचा मुख्य आहार म्हणजे बोर, अंजिर, वड, पिंपळ, जांभूळ, करवंद याचबरोबर किडे, पाली, गांधीलमाशा, छोटे उंदीरसुध्दा खातो. विणीचा हंगाम साधारण मार्च ते जून आहे.

## १०.४. पांढरपाठ गिधाड

### Indian White-rumped Vulture

वैशिष्ट्येः मृत जनावरे खाऊन दुर्गंधी तसेच रोगराईपासून मानवांची सुटका करणारी आणि परिसरात स्वच्छता ठेवणारी गिधाडे निसर्गात मोलाची कामगिरी पार पाडतात. कचऱ्याची आगारे, खाटीकखाने, खेडेगावाच्या बाहेर असणारे माळरान, डोंगरी किल्ले या ठिकाणी गिधाडे हमखास दिसत असत पण गेल्या २० वर्षामध्ये भारतीय उपखंडातील १० टक्के गिधाडे नष्ट झाली आहेत. पाळीव जनावरांमध्ये वेदनाशामक म्हणून डायक्लोफेनेक हे औषध वापरले जाते. गिधाडे मृत जनावरांचे मांस खातात व त्यातून डायक्लोफेनेक त्यांच्या शरीरात पसरते, ज्यामुळे त्यांची किडणी निकामी होऊन ते मरण पावतात. या औषधावर आता बंदी आलेली आहे. ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत मेलेली जनावरे आता मोठ्या प्रमाणात पुरली जात असल्याने खाद्यान्नाची कमतरता हे दुसरे प्रमुख कारण ठरते. गिधाडांची मादी एकावेळी एकच अंडे घालत असल्यामुळे त्यांची संख्याही आता वेगाने वाढत नाही. गिधाडांच्या रक्षणार्थ पश्चिम बंगाल व बिहार येथे गिधाड प्रजनन केंद्र सुरू केले आहे. या पक्ष्याचा समावेश अतिसंकटग्रस्त प्रजात म्हणून केला गेला आहे.

## १०.५. लांब चोचीचे गिधाड

### Longbilled Vulture

वैशिष्ट्येः खूपदा पांढरपाठ गिधाडाच्या जोडीने ही गिधाडे आकाशात उडताना दिसतात. उडताना या दोन जाती वेगवेगळ्या ओळखता येतात. पांढरपाठ गिधाड ंच्या पंखाच्या बाजूने ठसठशीत पांढरा पट्टा दिसतो ; पण लांब चोचीच्या गिधाडांच्या पंखांच्या बाजूने धुसर मातकट पांढरा पट्टा दिसून येतो. भारतामध्ये गिधाडाच्या नऊ जाती सापडतात. त्यातील तीन जाती महाराष्ट्रामध्ये सापडतात. त्याचबरोबर राज गिधाडव युरोशियन गिधाड ह्या जातीही महाराष्ट्रात आढळून आल्या आहेत. गिधाडांची संख्या लक्षणीयरित्या घटली असून अति संकटग्रस्त प्रजातीमध्ये त्यांची नोंद झाली आहे.

गिधाडांच्या महाराष्ट्रातील अलीकडील नोंदी-

पांढरपाठी गिधाड- नाशिक -मांगीतुंगी पर्वत- २००५, पुणे- ताम्हीणी घाट, वेल्हे- तोरणा, गरूड माची-२०११, नागपूर- चिमूर, दहेगांव- २००५, रायगड- मढेघाट, कोलाड , महाड, मुरुड, रत्नागिरी-आंजर्ले , मंडणगड, राजापूर.

लांब चोचीचे गिधाड- रायगड- श्रीवर्धन, हरिहरेश्वर, सिंधुदुर्ग- मालवण, आचरा, तारकर्ली, कोल्हापूर- पाटगांव (भूदरगड), नाशिक- त्र्यंबकेश्वर- २०१०, पुणे-कोंढवा डिसेंबर २०११, खंडाळा घाट, अमृतांजन, जुन्नर.

इजिप्तशीयन गिधाड- बणेश्वर (पुणे) २०१०, अजिंक्यतारा किल्ला (सातारा),

## १०.६. जंगली पिंगळा (घुबड)

### Forest Owlet

वैशिष्ट्येः या पक्ष्याचा पुनर्शोध ११३ वर्षांनी सुप्रसिध्द पक्षीतज्ज्ञ पमेला रासुमसेन व बेनकिंग यांनी ११९७ साली तोरणमाळ राखीव जंगल शहादा येथून लावला. हे घुबड दिनचर असून ते त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण अधिवासात सागव्याप्त जंगलाच्या पाणथळ जागी तसेच उघड्या गवताळ झुडपी भागामध्ये आढळते. या घुबडाचा मुख्य आहार म्हणजे मोठे सरडे, उंदीर, छोटे पक्षी तसेच विविध किटकांचा समावेश असतो. त्याच्या भक्ष्यामध्ये १२ जातींचे विविध लहान प्राणी, ५ जातींचे सरपटणारे प्राणी व विविध किटकांचा समावेश असतो. या पक्ष्याचा प्रजनन काळ ऑक्टोबर ते मे असून, मऊ लाकडाच्या झाडावर किंवा नैसर्गिक ढोली तसेच सुतार पक्ष्याने झाडावर केलेले घरटे यामध्ये तो आपले घरटे बनवतो. पिल्लांची काळजी नर, मादी दोघेही घेतात. या पक्ष्याला असणारे प्रमुख धोके म्हणजे त्याची अंडी घरट्यातून काढली जातात. लहान पिल्लांची शिकार केली जाते. तर सर्वाधिक धोका म्हणजे त्याच्या अधिवासावर होत असलेले आक्रमण, अतिचराई, अनियंत्रित जळावू लाकूड तोड, जंगलाला लागणारे वणवे तसेच या पक्षाबद्दल असणारी

अंधश्रध्दा. शेतीमध्ये वापरली जाणारी कीटकनाशके व उंदीर मारणारी औषधे याच्यामुळेही याला धोका निर्माण झाला आहे. सातपुडा पर्वतातील सागव्याप्त जंगले ही या पक्षाची मुख्य आश्रयस्थाने आहेत. महाराष्ट्रामध्ये सातपुड्यातील नंदूरबार, जळगाव, अकोला व अमरावती या जिल्ह्यांमध्ये या पक्ष्याच्या खात्रीशीर नोंदी मिळाल्या आहेत. वन्यजीव कायदा सूची वर्ग अ मध्ये अतिसंरक्षित पक्षी म्हणून या पक्ष्याचा समावेश केला गेला आहे. या पक्ष्याला वाचविण्यासाठी सातपुडा पर्वतातील वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधतेचे संरक्षण करणे अत्यावश्यक ठरते.

## १०.७. मोठा धनेश
## Malabar Pied Hornbill

वैशिष्ट्येः ह्या पक्ष्याचे प्रामुख्याने कोकणात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, रायगड तसेच विदर्भात वास्तव्य आहे. जुन्या पुरातन फायकस वर्गीय (वड, पिंपळ इ.),आंबा, गोरख चिंच, फणस, चिंच या महाकाय झाडांच्या ढोलीमध्ये तसेच देवरायांमध्ये असणाऱ्या जुनाट वृक्षांच्या ढोलीमध्ये आपले घरटे बनवतो. विणीची वेळ जवळ आली की मादी झाडाच्या ढोलीत जाऊन बसते. स्वतःची विष्ठा, ओली माती व शेणाने ढोलीचे तोंड लिंपून घेते. फक्त चोच बाहेरकाढता येईल एवढीच फट ठेवते. तीन महिने अंडी उबवल्यावर पिल्ले बाहेर आल्यानंतर नर आणि मादी पिल्लांना भरवतात. अशा प्रकारे अंडी व पिल्लांचे साप आणि इतर भक्षकांपासून संरक्षण होते. या पक्ष्याचा सदाहरीत जंगलांमध्ये कजरा (डीूलहपी छ्टुि-ाळलर) तसेच फायकस वर्गीय वनस्पतींच्या बीज प्रसारणामध्ये मोठा वाटा असतो. घारीपेक्षा मोठ्या आकाराचा हा पक्षी त्याचा काळा रंग, पिवळ्या चोचीच्या विशिष्ट आकारामुळे ओळखता येतो. चोचीवर शिंगासारखा एक अवयव असतो. उडताना त्याच्या पंखांना असणाऱ्या पांढऱ्या छटा स्पष्टपणे दिसून येतात. या पक्ष्याचा मुख्य आहार म्हणजे वड- पिंपळांची फळे, तसेच जांभूळ, कीडे, पाली, छोटे उंदीर आणि साप.

## ११.फक्त पश्चिम घाटात आढळणारे पक्षी
(एपवशाळल इळीवी ष थर्शीशीप ञ्हरी)

१. मलबारी पोपट (Malabar Parakeet)
२. मलबारी राखी धनेश (Malabar Grey Hornbill)
३. निलगिरी कबूतर (Nilgiri Wood Pigeon)
४. निलगिरी तिरचिमणी (Nilgiri Pipit)
५. राखी डोक्याचा बुलबुल (Grey-Headed Bulbul)
६. पांढऱ्या पोटाचा निळा दयाळ (Whitebellied Blue Robin)
७. जाड शेपटीचा वटवट्या (Broadtailed Grassbird)
८. काळा तांबडा नाचण (Black and Orange Flycatcher)
९. निलगिरी नाचरा (Nilgiri Flycatcher)
१०. पांढऱ्या पोटाचा निळा नाचरा (White-bellied Blue Flycatcher )
११. वायनाड हास्यकस्तूर (Wynaad Laughing Thrush)
१२. केरळ हास्यकस्तूर (Kerala Laughing Thrush)
१३. Nilgiri Laughing Thrush निलगिरी हास्यकस्तूर
१४. तांबुस सातभाई (Rufous Babbler)
१५. छोटा शिंजिर (Small Sunbird)
१६. पांढऱ्या पोटाचा टकाचोर(White-bellied Treepie)
१७. करड्या छातीची हारोळी (Greyfronted Green Pigeon)
१८. छोटा तांबट (Whitecheeked Barbet)
१९. निलगिरी तांबट (Malabar Barbet)
२०. निलगिरी चंडोल (Malabar Lark)
२१. रक्तकंठी बुलबुल (Flamethroated Bulbul)
२२. निलगिरी कस्तूर (Nilgiri Thrush)
२३. निलगिरी निळा दयाळ Nilgiri Blue Robin
२४. निलगिरी फूलटोचा (Nilgiri Flowerpecker)
२५. व्हिगॉरचा शिंजीर (Vigors's Sunbird)
२६. मलबारी वनकसाई (Malbar Woodshirke)
२७. मलबारी मैना (Malabar Starling)
२८. पिवळ्या कंठाचा बुलबुल (Yellowthroated Bulbul)

## १२. पक्ष्यांची स्थिती व आढळ दर्शवणाऱ्या काही संक्षिप्त संज्ञा व त्यांचे अर्थ

cp : common passage migrant (सामान्य मार्ग प्रवासी)
cr : common resident (सामान्य निवासी)
cw : common winter visitor (सामान्य हिवाळी यात्री)
lcr : locally common resident (स्थानिक सामान्य निवासी)
lcw : locally common winter visitor (स्थानिक सामान्य हिवाळी यात्री)
np : not common passage migrant (मार्ग प्रवासी नाहीत)
nr : not common resident (सामान्य निवासी नाहीत)
ns : not common summer visitor (सामान्य उन्हाळी यात्री नाहीत)
nw : not common winter visitor (सामान्य हिवाळी यात्री नाहीत)
v : vagrant (भटके किंवा भ्रमणशील)